# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः28.04.2024** **वारःरविवार**

---

1. 99 हजार मेट्रीक टन कांदा निर्यातीला केंद्र सरकारची परवानगी
2. दिल्ली शीख गुरुद्वारा व्यवस्थापन समितीच्या, अनेक सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश
3. रशियाला युक्रेनवरील हल्ल्यासाठी पुरवठा चीननं थांबवला नाही तर कारवाई करण्याचा अमेरिकेचा इशारा
4. इराणनं ताब्यात घेतलेल्या जहाजावरील भारतीय खलाश्यांच्या सुटकेची आशा आणि
5. महाराष्ट्रातल्या कोकणासह देशातील अनेक भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<u>कांदा निर्यात</u>**

केंद्र सरकारनं 99 हजार मेट्रीक टन कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. बांग्लादेश, संयुक्त अरब अमिराती, भूतान, बहारिन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमध्ये शेतकऱ्यांना कांदा निर्यात करता येईल. याबरोबरच खास निर्यातीसाठी उत्पादित केलेला 2 हजार मेट्रीक टन पांढरा कांदा, पश्चिम आशिया आणि काही युरोपीय देशांमध्ये निर्यात करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. 2023-24 च्या खरीप आणि रब्बी हंगामात कांद्याचं उत्पादन घटलं होतं. त्यामुळे कांद्याचा देशांतर्गत पुरवठा सुरळित राहावा आणि किमतीवर परिणाम होऊ नये म्हणून केंद्र सरकारनं गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात कांदा निर्यातीवर बंदी घातली होती. दरम्यान, या वर्षी कांद्याच्या राखीव साठ्यासाठी 5 लाख टन कांदा खरेदीचं उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे अशी माहिती ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. या कांद्याच्या सुरक्षित साठवणुकीसाठी शीतगृहांची साठवणूक क्षमता 5 हजार मेट्रीक टनपर्यंत वाढवण्यात आल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. केंद्र सरकारचा कांदा निर्यातीवरील बंदी उठवण्याचा निर्णय स्वागतार्ह असून, सरकार नेहमी शेतकऱ्यांच्या हितासाठी कटीबद्ध असल्याची प्रतिक्रिया राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीत राज्यात तिसऱ्या टप्प्यात 7 मे रोजी तर चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी मतदान होणार आहे. सर्वच राजकीय पक्षांचा या दोन्ही टप्प्यांसाठी जोरदार प्रचार सुरू आहे. राष्ट्रीय स्तरावरच्या प्रमुख नेत्यांच्या सभा आयोजित केल्या जात असून समाजातल्या विविध घटकांच्या, बैठकी घेण्यावरही, भर दिला जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या कोल्हापूर आणि हातकणंगले लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी, भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल कोल्हापुरात जाहीर सभा झाली. गेल्या दहा वर्षांत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं देशासमोरील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत असं मोदी या सभेत म्हणाले. सरकारनं देशातल्या महिला आणि युवा पिढीला नेहमीच प्राधान्य दिलं आहे. आत्मनिर्भर भारत आणि स्टार्ट अप इंडिया सारख्या उपक्रमांद्वारे रोजगार निर्मितीला चालना दिली आहे असं सांगून सत्तेत आल्यास मुद्रा योजनेअंतर्गत कर्जाची रक्कम दुप्पट करण्यात येईल असं आश्वासन मोदी यांनी दिलं. विरोधी इंडी आघाडी केवळ देशविरोधी आणि तिरस्काराचं राजकारण करत आहे अशी टीका त्यांनी केली. कोल्हापुरात श्री अंबाबाई मंदिर तीर्थक्षेत्र

विकास आराखडा लवकरच पूर्णत्वास नेला जाईल असं मोदी यांनी सांगितलं. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते.

**खर्गे**

काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना 1 लाख रुपये रोख आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये 50 टक्के आरक्षण देऊ, असं आश्वासन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिलं आहे. आसाममधील बारपेटा जिल्ह्यातील कोयाकुची इथे काल एका प्रचार सभेत ते बोलत होते. काँग्रेस पक्ष युवकांना प्रशिक्षणासाठी एक लाख रुपये देण्यासोबतच तीस लाख नोकऱ्याही देणार आहे असं त्यांनी या सभेत सांगितलं.

**प्रवेश**

दिल्ली शीख गुरुद्वारा व्यवस्थापन समितीच्या अनेक सदस्यांनी काल भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपा सरचिटणीस तरुण चुग, पक्षाचे नेते मनजिंदर सिंग सिरसा आणि दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांच्यासह अनेक गुरुद्वारा समिती सदस्य यावेळी उपस्थित होते. देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता पुढे नेऊ शकेल असा भाजपा हा एकमेव पक्ष असल्याचं भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी यावेळी बोलताना सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शीख समुदायाच्या भल्यासाठी काम केलं आहे. देशावरील सर्व हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देण्यात आणि विजय मिळवण्यात शीख समुदायाचं मोठं योगदान आहे, असं नड्डा म्हणाले.

**काँग्रेस यादी**

काँग्रेस उत्तर प्रदेशातील प्रलंबित जागांसह लोकसभा उमेदवारांची पुढील यादी दोन दिवसांत जाहीर करेल असं काँग्रेस सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेश रायबरेली आणि अमेठी या महत्वाच्या जागांवरील उमेदवारीसंबंधी चर्चा करण्यासाठी काँग्रेसनं काल केंद्रीय निवडणूक समितीची बैठक घेतली. 2019 च्या निवडणुकीपर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशातील अमेठी आणि रायबरेली या जागांबाबत काँग्रेसनं मात्र अद्याप कोणतंही वक्तव्य केलेलं नाही.

**ब्लिंकन चीन**

रशियाला युक्रेनवरील हल्ल्यासाठीच्या सामग्रीचा पुरवठा चीननं थांबवला नाही तर अमेरिका चीनवर कारवाई करेल, असा इशारा अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांनी दिला आहे. ते बीजिंगमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. 'शीतयुद्धानंतरच्या युरोपियन सुरक्षेला सर्वात मोठा धोका निर्माण करण्याकरता आपण मदत करत आहात' असं आपल्या समकक्षांना आपण स्पष्ट केलं असल्याचं ब्लिंकन यांनी सांगितलं. मात्र याबाबत अमेरिका काय पावलं उचलणार हे मात्र त्यांनी सांगितलं नाही. चीन पश्चिम आशियामध्ये रचनात्मक भूमिका बजावू शकतो यावर त्यांनी भर दिला. चीनच्या इराणशी असलेल्या संबंधांचा वापर करून इस्त्रायलनं संघर्षामध्ये आणखी वाढ करू नये असा आग्रह; चीन करू शकेल असं ते म्हणाले. ब्लिंकन 10 महिन्यांमध्ये दुसऱ्यांदा चीन भेटीवर गेले असून संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याचे ते प्रयत्न करत आहेत.

**भारतीय खलाशी**

इराणनं ताब्यात घेतलेल्या मालवाहू जहाजावरील भारतीय खलाशी आणि अधिकाऱ्यांना भारतीय दूतावासाशी संपर्क साधण्यास परवानगी दिली आहे. पोर्तुगालमधल्या कंपनीच्या मालकीचं मालवाहू जहाज इराणी हद्दीतून प्रवास करत असताना इराणनं ताब्यात घेतलं होतं. इराण आणि इस्त्रायल यांच्या ताणलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर इराणनं हे जहाज

ताब्यात घेतलं होतं. मानवतेच्या दृष्टीकोणातून या खलाशांची सुटका करण्याचा विचार करत असल्याचं इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं प्रसिद्ध केलं आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी ह्या सर्व खलाशांशी आपलं सरकार संपर्कात असून त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली जात असल्याची ग्वाही दिली आहे. या खलाशांच्या कुटुंबियांशीही आपण संपर्कात असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं.

**समलिंगी संबंध**

इराकच्या संसदेनं काल समलिंगी संबंधांवर निर्बंध घालणाऱ्या कायद्याला मान्यता दिली. समलिंगी संबंध ठेवणाऱ्यांना 15 वर्षांच्या तुरुंगवासाची तर समलिंगी संबंधांना किंवा अश्या प्रकारच्या व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्यास किमान 7 वर्षे तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. लिंगबदल आणि आकर्षक पेहराव यांनाही बंदी घालण्यात आली असून त्यासाठी एक ते तीन वर्षे तुरुंगवास होणार आहे. इराकमध्ये असलेल्या मुस्लीम धर्मियांपैकी पुराणमतवादी समाजाचं संसदेत बहुमत असून समलिंगी संबंधांमुळे नैतिकता भ्रष्ट होते असा मतप्रवाह जोर धरत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा कायदा करण्यात आला आहे. जागतिक पटलाचा विचार केला, तर समलिंगी संबंधांना सुमारे 130 देशांमध्ये मान्यता असून 60 हून अधिक देशामध्ये असे संबंध गुन्हा मानला जातो.

**चीन**

चीनच्या ग्वांगझाव भागाला काल चक्रीवादळाचा तडाखा बसला असून पाच जणांचा बळी गेला आहे तर अनेक जण जखमी झाले आहेत. दक्षिण चीनमध्ये सतत कोसळणारा पाऊस आणि पूर यानंतर हे चक्रीवादळ आलं असून अनेक कारखान्यांचं नुकसान झालं आहे. येत्या दोन दिवसांतही मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा चीनच्या हवामान विभागानं दिला आहे.

**उष्णतेची लाट**

पश्चिम बंगाल आणि ओडिशामध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा भारतीय हवामान विभागानं जारी केला आहे. बिहार, झारखंड, रायलसीमा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, माहे, कोकण, उत्तर प्रदेश, किनारी आंध्र प्रदेश आणि यानममध्ये पुढील चार ते पाच दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. पश्चिम आसाम, मेघालय आणि त्रिपुरामध्ये उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे, तर केरळ, माहे, किनारी कर्नाटक, किनारी आंध्र प्रदेश, यानम आणि कोकणातही 1 मे पर्यंत अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, उद्या हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू काश्मीर गिलगिट बाल्टिस्तान मुझफ्फराबाद इथे पाऊस आणि गारपिटीचा अंदाज असून पुढील दोन ते तीन दिवस ईशान्य भारतात विजांच्या कडकडाटासह वादळाचा अंदाज आहे. दिल्लीत आज आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कमाल आणि किमान तापमान 39 आणि 22 अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.